परवानगी वर्ष :- २०१०-२०११
माध्यम : - इंग्रजी
**कायम विना अनुदान**

जा.क.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०११ 90८90192 (५)
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 3 1 MAY 2011

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे

विषय :- कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ.८वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाच्या वर्गांना प्रथम मान्यता प्रदान करणेबाबत..
**मातृ विद्यालय,चिंचवड,पुणे**

संदर्भ- **१) शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०**
२) आपले पत्र क्रमांक जिप/शिक्षण/माध्य/१४२९/११ दि. ०२.०५.२०११
**३) शासन पत्र क्रमांक इंमाशा-२०१०/(२४/१०)/माशि-१ दिनांक १७.०५.२०१०**
**४) शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०**

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन **मातृ एज्युकेशन सोसायटी चिंचवड,पुणे** संचलित **मातृ विद्यालय,चिंचवड, पुणे जिल्हा पुणे** या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(जून-२०१० पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.)**

१. नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
४. संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
७. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

**इतर अटी :-**

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येंवू नयेत.
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४ दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

Scanned with OKEN Scanner

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु **प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.**

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे.

२/- **त्यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. मुख्याध्यापक, मातृ विद्यालय,चिंचवड, पुणे
जिल्हा पुणे.

प्रत माहितीसाठी सादर,
१. डॉ.सुवर्णा सि.खरात
अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

२. निवडनस्ती.

Scanned with OKEN Scanner

**कायम विनाअनुदानित**

जा.क्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मान्यता/पुत्रि/२३५६६/२२९
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 22 SEP 2003

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
पिंपरी-चिंचवड.

विषय : सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत (माध्यम - इंग्रजी).

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक व्हीएसएल- १००३/(५५७/२००३)/प्राशि-३, दिनांक ७ ऑगस्ट २००३

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विनाअनुदान** तत्वावर परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | मातृ एज्युकेशन सोसायटी, स.नं. १२२, श्री दत्तनगर वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे. | वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे | इंग्रजी | १ ली |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबधित संस्थाना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेश समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबधित संस्थाना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना-अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात.
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता )

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. मा. अध्यक्ष/सचिव, मातृ एज्युकेशन सोसायटी, स.नं. १२२, श्री दत्तनगर वाल्हेकर वाडी, चिंचवड, पुणे.

क्रमांक–शिक्षण/खाप्राशा/३/कावि/ 489/2008.
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
दिनांक – 10/ 6 /2008

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
मातृ
~~[illegible]~~ इंग्लिश विद्यालय
वाल्हेकरवाडी चिंचवड.

विषय :– कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :– १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[१०००/०२] /प्राशि–३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. 10/6/08 चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या नैसर्गिक / ~~अतिरिक्त~~ तुकड्या वर्गांना २००3 – २००8 या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक वा ~~अतिरिक्त~~ | ~~बिनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | मातृ | | | | |
| 1) | ~~[illegible]~~ इंग्लिश विद्या. वाल्हेकरवाडी. चिंचवड. | इंग्लिश | इ.२री. | नैसर्गिक | प्रथमवर्गास मान्यता. |

शाळेने वरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता असलेला आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [एस. एस. सी. डी. एड. ]

[कृ. मा. प. ]

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खातरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७] पुढील शैक्षणिक वर्षात ५ पटसंख्या वाढविण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.
१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

क्रमांक–शिक्षण/खाप्राशा/३/काबि/ ६(७/२००५
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.
दिनांक –२९/१०/२००५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

माऊ इंग्लिश मीडियम स्कूल
वाळेकरवाडी चिंचवड

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत. [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक व्हीएनएस/१००२/[१०००/०२] /प्राशि–३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. ३/१०/०५ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्ताच्या नैसर्गिक / ~~अतिरिक्त~~ तुकड्या वर्गांना २००५–२००६ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक वा ~~अतिरिक्त~~ | ~~विनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १) | माऊ इंग्लिश मी. स्कूल वाळेकरवाडी चिंचवड. | इंग्रजी | इ.३री | नैसर्गिक | इ.३री पासून सन २००५-०६ |

शाळेने वरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [एस. एस. सी. डी. एड. ]

[कृ. मा. प.]

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खातरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद् करण्यात येईल.

७] पुढील शैक्षणिक वर्षात ५ पटसंख्या वाढविण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

६४०४

क्रमांक-शिक्षण/प्राशिशा/३/कावि/ /०६८
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
दिनांक - १६ / १० /२००६

प्रति,

मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,

मातृ इंग्लिश मेडियम स्कूल
अलंकापुरम वसाहत, दिघी — कायम विना अनुदानित

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत. [ इंग्रजी माध्यम]

संदर्भ : १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[१०००/०२] / प्राशि-३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. १६/१० /०६ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणांकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्ताच्या नैसर्गिक/ अतिरिक्त तुकड्या वर्गांना २००० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक का अतिरिक्त | ~~विनाअनुदानित~~ / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | मातृ इंग्लिश मेडियम स्कूल. अलंकापुरम वसाहत दिघी | इंग्लिश | इ.४ थी | नैसर्गिक | इ.४ थी प्रथम वर्ग सन २००६-०७ |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम असे कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [ एस.एस.सी. डी.एड.]व

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषायक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

[ कृ. मा. प...

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

७) पुढील शैक्षणिक वर्षापासून पुढच्या वर्गाच्या [illegible] मान्यता देण्यात येते

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

(स्वाक्षरी)
प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

क्रमांक-शिक्षण/प्राप्राशि/३/कावि/६४०/०८
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, १८.
दिनांक -१७/ १२/२००८

प्रति,
मुख्याध्यापक/ मुख्याध्यापिका,

मातृ विद्यालय, दत्तनगर
वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे-३३.

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/ ~~अतिरिक्त~~ वर्ग ~~तुकड्या~~ मंजूर करणेबाबत. [ इंग्रजी माध्यम]

संदर्भ : १] शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस/१००२/[४०००/०२] / प्राशि-३ दि. २४ जानेवारी २००३.

२] आपणाकडील दि. १२/१० /०८ चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्ताच्या नैसर्गिक ~~अतिरिक्त तुकड्या~~ वर्गांना २००८ - २००९ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ नैसर्गिक का अतिरिक्त | विनाअनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १) | मातृ विद्यालय, दत्तनगर, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे-३३. | इंग्रजी | ५वी व ६वी | नैसर्गिक | इ. ५वी २००७-०८ व इ. ६वी २००८-०९ या शै. वर्षात प्रत्येकी प्रथम वर्ग कायम विना अनु. तत्वावर मंजूर. |

शाळेने सदरचे वर्ग अथवा तुकडी मंजुरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक व कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे. [ एस.एस.सी. डी.एड.]

२] सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

[ कृ. मा. प...

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रदद् करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
क्रं - शिक्षण/खाप्राशा/३/कावि/ ७४६ /२००९
दिनांक :- २० / ०२/२०१०

प्रति,

मुख्याध्यापक,
मातृ विद्यालय,
वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे-३३.

विषयः- नैसर्गिक वाढीचे वर्गी व अतिरिक्त तुकडीस सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मंजूरी देणेबाबत...

संदर्भः- १) शासन निर्णय क्रं. व्हीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दिः- १४/०१/०३

२) आपणांकडील दिनांकः- २३/११/२००९ चे दोन प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडयांना खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मातृ विद्यालय, वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे-३३ | इंग्रजी | इ ७ वी चा प्रथम वर्ग व इ. १ ली ची २ री अतिरिक्त २ री तुकडी | नैसर्गिक वाढीचा वर्ग व अतिरिक्त तुकडी | १) इ ७ वी चा प्रथम वर्ग व २) इ. १ ली ची अतिरिक्त २ री तुकडी सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात मंजूर |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

<u>अटी व शर्ती :-</u>

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड.)
२) सदर शाळेंने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) शाळेत आगप्रतिबंधक सुविधांची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

प्रतः- १) माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

२) अध्यक्ष/सचिव, मातृ एज्युकेशन सोसायटी.

महाराष्ट्र शासन

शासन परवानगी आदेश

क्रमांक इंमाशा २०१०/ २४ /१०/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक ~~[illegible]~~ २०१०.
१७ मे,

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते १२ वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा दि. २५.३.२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **मातृ एज्युकेशन सोसायटी, चिंचवड, पुणे** या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वीपर्यंत सुरु असलेल्या **मातृ विद्यालय, चिंचवड** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ.१२ वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १२ वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(डॉ. सुवर्णा सि.खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक/ शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद , नाशिक
सचिव, **मातृ एज्युकेशन सोसायटी, चिंचवड, पुणे**
निवड नस्ती, माशि-१.

I:\rekha\note\NEW ENG PERMENG NEW-matru edu-pune-29310